**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ४५३/२०२१**

**अपिलार्थी, श्री. नरेंद्र भगवानदास गोयल**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, मुल ता. मुल जिल्हा चंद्रपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिल कार्यालय, मुल ता. मुल जिल्हा चंद्रपूर**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.११.२०२२**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.११.२०२० | १८.११.२०२० | १७.१२.२०२० | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०९.११.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "सर्व्हे नं. ३७०/१०मौजा मुल येथील खाली लिहलेले फेरफारचे पुर्ण प्रकरणची सत्यप्रत मिळणेबाबत १) फेरफार क्र. ३०१५ दिनांक २२.०२.२०१० २) फेरफार क्र. ७०८६ दिनांक १४.०५.२०१२ ३) फेरफार क्र. ७०८८ दिनांक २७.०७.२०१२ ४) फेरफार क्र. ७१७१ दिनांक २७.०८.२०१२ ५) फेरफार क्र. ७१७८ दिनांक २६.०९.२०१२ ६) फेरफार क्र. ७२०४ दिनांक ०६.१२.२०१२" याबाबत माहिती मागितल्याचे दिसून येते. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी दिनांक १८.११.२०२० रोजी अपीलार्थीस कळविले की, मागितलेली माहिती अर्ज तलाठी त.सा.क्र.५ तथा सहायक जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(३) दोन अन्वये हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यानंतर अपीलार्थी यांनी **दिनांक १७.१२.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "तलाठी मूल यांनी माहिती न दिल्यामुळे" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केलेला नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०२.२०२१ रोजी** "अपील सुनावणी घेण्यात आली नाही" असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर दिनांक २१.११.२०२२ रोजी आयोगात सुनावणी आयोजित करण्यात आली असून

सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री. पी.आर. साधनकर उपस्थित आहेत, तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार डॉ. रविंद्र होळी उपस्थित आहेत.

सुनावणी दरम्यान उपलब्ध कागदपत्रे तसेच आयोगासमोर झालेला युक्तीवाद लक्षात घेता, अपीलार्थी श्री. गोयल यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी अपिलार्थी यांचा अर्ज तलाठी त.सा.क्र.५ तथा सहायक जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(३) दोन अन्वये हस्तांतरीत केला असून कोरोना महामारीच्या कालावधीमुळे अपीलार्थीस माहिती पुरविण्यात तलाठी कार्यालयाकडून विलंब झालेला आहे. आज सुनावणी दरम्यान प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहिती संबंधीत कागदपत्रांबाबत फेरफार नोंद रुजु करण्यात आलेली असुन फेरफारबाबत प्रत पाहिजे असल्यास पैसे भरुन प्राप्त करुन घेण्याबाबत दुरध्वनीवरुन सूचना देण्यात आलेली असल्याचे आयोगास दिनांक १५.११.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे कळविले असून सुनावणी दरम्यान देखील कथन करण्यात आले.

आज सुनावणी दरम्यान अपीलार्थी श्री. गोयल अनुपस्थित आहेत. त्यामुळे अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती कलम २(च) नुसार आहे त्या स्थितीत विनामुल्य देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २१.११.२०२२**

जावक क्रमांक 4118 दिनांक 3 JUL 2023